# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

नॅक अ+ दर्जा प्राप्त

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

## तात्काळ परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक यांना कळविण्यात येते की, मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि. २०.०८.२०२६ रोजी झालेल्या बैठकीतील प्रस्ताव क्र. ०५ व ०६ वर पारित ठरावानुसार हिवाळी-२०२६ च्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी बहिस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक (External Senior Supervisor) यांची नियुक्ती करण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक यांच्याकडून विद्यापीठ मान्यता प्राप्त किमान ०३ अध्यापकांचे नावे मागविण्यात यावे व परीक्षा कॉपीमुक्त वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी परीक्षा केंद्रांना आस्कमिक भेटी देण्यासाठी जिल्हा व मार्ग निहाय (Route Wise) भरारी पथकात अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक यांच्याकडून विद्यापीठ मान्यता प्राप्त किमान ०२ अध्यापकांचे नावे मागविण्यात यावे. जे महाविद्यालय/परिसंस्था नावे सादर करणार नाहीत त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४८(५)(क) अन्वये गठीत समितीकडे पुढील कार्यवाहीस्तव प्रस्तावित करण्यात यावी. असा ठराव पारित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार हिवाळी-२०२६ च्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या पदवी, पदविका व पदव्युत्तर परीक्षा कॉपीमुक्त वातारणात पारपाडण्यासाठी विद्यापीठाच्या सर्व परीक्षा केंद्रांवर बहिस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक (External Senior Supervisor) व परीक्षा केंद्रांना आकस्मित भेटी देण्यासाठी भरारी पथक यांची नियुक्ती करावयाची आहे, त्यासाठी सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक यांनी त्यांच्या महाविद्यालय/परिसंस्थात कार्यरत विद्यापीठ मान्यता प्राप्त व अनुभवी एकुण ०५ अध्यापकांची नावे विद्यापीठास सादर करावीत. ०५ अध्यापकांपैकी ०३ अध्यापकांची नियुक्ती बहिस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक (External Senior Supervisor) व ०२ अध्यापक यांना भरारी पथकात अध्यक्ष/सदस्य म्हणून नियुक्ती करावयाची आहे. त्यास्तव सदर अध्यापकांची माहिती सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**१. सोबत जोडलेल्या परिशिष्ट १ व २ नुसार Microsoft Excel अंतर्गत Times New Roman Font मध्ये माहिती तयार करुन सॉफ्ट कॉपी तात्काळ coordination.exam@bamu.ac.in या ईमेल आयडीवर तात्काळ पाठविण्यात यावी.**

**२. सोबत जोडलेल्या परिशिष्ट १ व २ नुसार माहिती तयार करुन प्राचार्य/संचालक यांच्याकडून प्रमाणित करुन कक्ष प्रमुख, समन्वय कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर यांना १० ऑक्टोबर, २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेच्या आत विशेष प्रतिनिधीमार्फत सादर करण्यात यावी व सोबत अध्यापकांना विद्यापीठाने दिलेल्या मान्यतेची छायांकित प्रत जोडण्यात यावी.**

सदरील बाबीची गांभीर्याने नोंद घेऊन तात्काळ नावे सादर करावीत, अन्यथा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ४८(५)(क) अन्वये गठीत समितीकडे पुढील कार्यवाहीस्तव प्रस्तावित करण्यात येईल.

हे परिपत्रक विद्यापीठाच्या www.bamu.ac.in & bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिद्ध करण्यात आले आहे. तसेच माहिती पाठविण्यासाठी विहित प्रपत्र जोडले आहे.

**सोबत : वरीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| विद्यापीठ प्रांगण, छत्रपती संभाजीनगर-४३१००४ | : | **प्रा. (डॉ.) बाबासाहेब एन. डोळे** |
| संदर्भ क्र. : परीक्षा व मूल्यमापन/समन्वय/२०२६/ 884 | : | संचालक, |
| दिनांक : २२.०९.२०२६ | : | परीक्षा व मूल्यमापन मंडळ |

**Appendix – I**

## DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

### List of External Senior Supervisor for Oct / Nov 2026 Examinations

**Principal / Director Name:** ______________________________________**Mobile No.:** ______________________

**College / Institute Email ID:** ________________________________________________**College Code:** _________

**Name of College / Institute:** ______________________________________________________________________

| Sr. No. | Name of Teacher | Name of Post | Nature of Post | Mobile No. | Email ID | Date of Joinnig | Teaching Subject |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | | | |
| 2. | | | | | | | |
| 3. | | | | | | | |

**Signature**
**PRINCIPAL / DIRECTOR**
**Seal**

**Appendix – II**

## DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

### List of Vigilance Squad for Oct/Nov 2026 Examinations

**Principal/Director Name: ______________________________________Mobile No.: _______________________**

**College/Institute Email ID: _______________________________________________College Code: _________**

**Name of College/Institute: _______________________________________________________________________**

| Sr. No. | Name of Teacher | Name of Post | Nature of Post | Mobile No. | Email ID | Date of Joinnig | Teaching Subject |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | | | |
| 2. | | | | | | | |

**Signature**
**PRINCIPAL/DIRECTOR**
**Seal**